# -: मागील तीन महिण्यात केलेल्या कार्यवाहीची माहिती :-

१) किमती मालमत्ता चोरी, दरोडा, जबरीचोरी, वाहन चोरी, घरफोडीचे २५ गुन्हे उघडकीस आणण्यात आले असुन त्यामध्ये आरोपीतांकडुन रु. ५९,०३,६००/- (एकोनसाठ लाख तिन हजार सहाशे रुपये) चा माल हस्तगत केला आहे.

२) विना परवाना अवैध रित्या शस्त्र बाळगणाऱ्यांविरुध्द कारवाही करुन दोन देशी कट्टे हस्तगत करण्यात आले असुन, त्या मध्ये आरोपी नामे बंदेखान पठान रा. गोंदीया याचा समावेश असुन गोंदीया पोलीसांचे अभिलेखावर हा आरोपी मागील दोन वर्षापासुन खंडणी, दरोडा, सामुहीक बलात्कार, प्राणांतीक दुखापत, मोक्का यासारख्या अतिशय गंभीर गुन्ह्यांतील आरोपीचा समावेश असुन या आरोपीच्या अटकेमुळे गोंदीया पोलीसांनाही फार मोठी मदत भंडारा जिल्हा पोलीस दलाकडुन झालेली आहे. त्या सोबतच आरोपी नामे अजय ताराचंद कनोजे रा. शास्त्री वार्ड वरठी याचे कडुन सुध्दा एक देशी कट्टा जप्त करण्यात आला आहे.

३) अवैध रेती व्यवसायीकांविरूध्द वेळोवळी कारवाई करुन ११ गुन्हे दाखल करण्यात आले असुन त्यांचे कडुन रु. १,३२,११,३०० /- (एक कोटी बत्तीसलाख अकरा हजार तिनशे रुपये) चा माल हस्तगत करण्यात आला.

४) अवैध दारूविक्री व दारुबंदी असलेल्या चंद्रपुर व गडचिरोली जिल्ह्यामध्ये होणाऱ्या दारु तस्करीवर मोठ्या प्रमाणात आळा घालण्यात आला असुन अद्याप पावेतो १८३ गुन्हे दाखल करण्यात आले असुन रु. ३३,६०१३२/- (तेहत्तीस लाख साठ हजार एकशे बत्तीस रुपये) चा माल हस्तगत करण्यात आला.

५) अवैध जुगार कायदयाखाली ३५ गुन्हे दाखल करण्यात आले असुन रु. १८,१२,१८३/- (अठरा लाख बारा हजार एकशे त्र्याऐंशी रुपये) चा मुद्देमाल हस्तगत करण्यात आला आहे.

६) अवैध गांजा व्यवसाय करणारे ३ इसमांवर कार्यवाही करण्यात आली असुन रु. १०,२००/- (दहा हजार दोनशे रुपये) चा मुद्देमाल हस्तगत करण्यात आला आहे.

७) जिल्ह्यातुन जाणाऱ्या राष्ट्रीय महामार्गावरुन होणारी अवैध जनावरांची वाहतुक करणाऱ्यां विरुध्द ४१ गुन्हे दाखल करण्यात आले असुन रु. २,३०,५१,९८५/- (दोन कोटी तिस लाख एकावण्ण हजार नऊशे पंच्याऐंशी रुपये) चा मुद्देमाल हस्तगत केला आहे.

८) मेडीकल अधिनियम अंतर्गत बोगस डॉ. वर १ गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

९) तडीपारचे हद्दपार झालेल्या ५ ईसमांवर कार्यवाही करण्यात आलेली आहे. मागील तिन महिण्यात उपविभागीय दंडाधिकारी यांचे कडे एकुन ५ प्रस्ताव पाठविण्यात आले आहे.

१०) स्त्रीयांचा अनैतीक व्यापार प्रतीबंधक कायदा अंतर्गत २ केसेस करण्यात आले आहे.

११) फिरते पोलीस स्टेशनचे माध्यमातुन जिल्ह्यातील सर्व गावांमध्ये भेटी देण्यात आल्या असुन समाजाच्या शेवटच्या घटकापर्यंत पोहचुन त्यांच्या समस्या सोडविण्यात मोठ्या प्रमाणात यशस्वी झालेले आहे.

१२) महिलांवरील अत्याच्याराची प्राधाण्यांने दखल घेण्यात आलेली आहे. महिलांसाठी सुरु करण्यात आलेल्या निर्भय बनो या अभियानाअंतर्गत महाविद्यालयीन युवती, महिला यांचे मध्ये आत्मविश्वास व पोलीसांप्रती विश्वास निर्माण करण्यात जिल्हा पोलीस दल यशस्वी झालेले आहे.

१३) महत्वाचे गुन्ह्यांमध्ये दोषसिध्दी व्हावी या करीता जातीने लक्ष दिले जात आहे. त्याचाच परीणाम म्हणुन दोन आरोपीतांना मरेपर्यंत फाशिची शिक्षा झालेली आहे.

१४) अल्पवयीन मुलींवर होणाऱ्या अत्याचाराची विशेष दखल घेवुन महिला अधिकाऱ्यांमार्फत तपास करुन वेळेत न्यायालयात दोषारोप पत्र दाखल करण्यात येत असुन यामध्ये दोषसिध्दीचा दर ५० टक्यांपर्यंत असुन सर्वच गुन्ह्यात आरोपीला शिक्षा व्हावी या करीता अधीक तंत्रशुध्द तपास करण्याबाबत वेळोवेळी सुचना देण्यात येत आहे.

१५) प्रतीसाद ॲप, सिटीझन कॉप, फेसबुक, ट्वीटर, व्हॉट्स ॲप या सारख्या समाज माध्यमांवर येण्याऱ्या तक्रारींचीही वेळीच दखल घेण्यात येत आहे.